# पुणे

बुधवार 02 सप्टेंबर 2026

· वर्ष : 01
· अंक : 274
· किंमत : 3 रू.
· पाने : 4+2

# हॅलो प्रभात

▪ मुंबई ▪ अहिल्यानगर ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सांगली

पुणे आवृत्ती






PRGI NO. MAHMAR/25/A3118 ▪ बुधवार, ०२ सप्टेंबर २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४+२


## संक्षिप्त

### आता मतदारांची लीटमस टेस्ट सुरू

पिंपरी : हॅलो प्रभात



विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेत ३१ ऑगस्टला प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आता मतदारांची लिटमस टेस्ट करण्यात येणार आहे. पिंपरी, चिंचवड व भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघांमध्ये तब्बल ६ लाख ८ हजार ९७२ मतदार प्रारूप यादीत समाविष्ट झालेले नाहीत, त्यामुळे नागरिकांनी त्यांचे स्वतःचे व कुटुंबीयांच्या नावाची तपासणी करण्याची सूचना निवडणूक आयोगाने दिली आहे.

### सप्टेंबरमध्येही पावसाची ओढ

पुणे : हॅलो प्रभात

आगस्ट महिन्यात सरासरीच्या १३.८ टक्के देशात तुटीच्या पाऊस नोंदविण्यात आला आहे. दरम्यान सप्टेंबर महिन्यात देखील सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. यंदा मान्सूनचा हंगाम तोट्यात जाणार असून देश दुष्काळाच्या गर्तेत सापडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# भाजप सरकारचे आश्वासन म्हणजे ‘लबाडाघरचे जेवण’

## हर्षवर्धन सपकाळ : आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मंजूर करा

### आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा





नाशिक : हॅलो प्रभात

आदिवासी विद्यार्थी गेल्या १५ ते २० दिवसांपासून विविध मागण्यांसाठी उपोषण करत असताना भाजपा महायुती सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत आहे. राहुल गांधी यांनी पुण्यातील ‘छात्रों की गुंज’ कार्यक्रमात आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांमध्ये लक्ष घातल्यानंतर सरकार खडबडून जागे झाले असून, घाईघाईने मागण्या मान्य केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, सरकारच्या आश्वासनांवर विश्वास ठेवता येणार नाही. देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन म्हणजे ‘लबाडाघरचे जेवण’ असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

नाशिक येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनस्थळी सपकाळ यांच्यासह विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, आदिवासी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विक्रांत भुरिया आणि काँग्रेसच्या नेत्यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नाशिक विभागात आदिवासींची संख्या मोठी असल्याने नाशिकमध्ये स्वतंत्र मंत्रिमंडळ बैठक घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या तातडीने मंजूर कराव्यात, अशी मागणी सपकाळ यांनी केली.

आदिवासी विकास विभाग हा भ्रष्टाचाराचे कुरण बनला असून योजनांचा पैसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप सपकाळ यांनी केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, मागील दोन वर्षांत ८९२ आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून, त्याला फडणवीस सरकार जबाबदार आहे. विभागातील अनागोंदी कारभार पाहता आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

बिंदूनामावलीत खोडसाळपणा करून आदिवासींच्या हक्कांवर गदा आणली जात आहे. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अन्नाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून सेंट्रल किचन तातडीने बंद करावे, अशा मागण्याही त्यांनी मांडल्या. विद्यार्थ्यांच्या या मागण्या तातडीने मान्य करून त्यांची अंमलबजावणी करावी, असे सपकाळ म्हणाले.

राहुल गांधी २ सप्टेंबर रोजी नाशिक दौऱ्यावर येत असल्याने सरकार विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य असल्याचे घाईघाईने सांगत आहे, असा आरोपही त्यांनी केला. नाशिकप्रमाणेच पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील विविध भागांत आदिवासी विद्यार्थ्यांची आंदोलने सुरू आहेत. या सर्व आंदोलनांना काँग्रेसचा पाठिंबा असून, संबंधित प्रतिनिधींशी पक्षाच्या वतीने संवाद साधला जाणार असल्याचे सपकाळ यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘छात्रों की गुंज’ अभियानावर केलेल्या टीकेवरही सपकाळ यांनी पलटवार केला. ‘खोटं बोल पण रेटून बोल’, ही भाजप आणि फडणवीस यांची शैली असून, ‘छात्रों की गुंज’ अभियानामुळे सरकारची झोप उडाल्याचे स्पष्ट दिसत असल्याचे ते म्हणाले. यावेळी विजय वडेट्टीवार आणि डॉ. विक्रांत भुरिया यांनीही आदिवासी विभागातील कथित भ्रष्टाचार आणि सरकारच्या कारभारावर टीका केली.

# संशयास्पद मतदारांची यादी जाहीर करा

मुंबई : हॅलो प्रभात



विशेष पुनरिक्षण मोहिमेंतर्गत महाराष्ट्रातील प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. या यादीत संशयास्पद तसेच नकाशावर न जुळलेल्या मतदारांची नावे असून, त्यावर कोणतीही खूण करण्यात आलेली नाही. त्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.

**काँग्रेसची मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे मागणी**

ज्या मतदारांना नोटीस देऊन सुनावणीसाठी बोलावले जाणार आहे, अशा मतदारांची मतदान केंद्रनिहाय यादी तातडीने प्रसिद्ध करून ती राजकीय पक्षांना उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केली आहे.

महाराष्ट्रात एक कोटी ५२ लाख मतदार सापडले नाहीत किंवा कायमचे स्थलांतरित झाल्याचे दाखविण्यात आले आहे. याच पद्धतीने आणखी मोठ्या संख्येने मतदारांची नावे वगळली जाण्याची भीती काँग्रेसने व्यक्त केली. नोटीस व सुनावणीची कार्यपद्धतीची माहिती अद्याप मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेली नसल्याचेही काँग्रेसने सांगितले. याबाबत सरचिटणीस ॲड. संदेश कोंडविलकर यांनी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे मागणी केली.

# महाडीक मल्टीस्टेटचे पुण्यात यशस्वी पदार्पण

## राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते गुलटेकडी शाखेचे उद्घाटन

पुणे : हॅलो प्रभात



सहकार क्षेत्रात विश्वास संपादन केलेल्या वनश्री नानासाहेब महाडीक मल्टीस्टेट अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, ईश्वरपूरने पुण्यात पदार्पण केले आहे. गुलटेकडी येथील संस्थेच्या नवीन शाखेचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते उत्साहात झाले. पुण्यातील विस्तारामुळे संस्थेच्या सहकार क्षेत्रातील वाटचालीला नवी दिशा मिळाल्याचे यावेळी सांगण्यात आले. ग्रामीण भागातून सुरू झालेल्या संस्थेने ग्राहक व सभासदांच्या विश्वासाच्या बळावर आर्थिक सेवा क्षेत्रात प्रगती केली आहे. पुणे हे उद्योग, व्यापार, शिक्षण व आर्थिक व्यवहारांचे प्रमुख केंद्र असल्याने नवीन शाखेमुळे उद्योजक, व्यापारी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांना अधिक सुलभ आर्थिक सेवा मिळतील, असे मोहोळ यांनी सांगितले.

महाडीक परिवाराच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील कार्याचे कौतुक करताना विश्वास, पारदर्शकता व सेवाभावाच्या त्रिसूत्रीवर संस्थेची वाटचाल उल्लेखनीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थापक राहुलदादा महाडीक यांनी ग्राहकांचा विश्वास

**सहकारातून विस्ताराचा नवा अध्याय**

ही संस्थेची खरी ताकद असल्याचे सांगून पुणे शाखेतून तत्पर व पारदर्शक सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. सांगली जिल्हा भाजप ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष सम्राटबाबा महाडीक यांनीही संस्थेच्या विस्ताराबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार महेश लांडगे, मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, चेअरमन सतीशदादा महाडीक, उपाध्यक्ष प्रदीप पाटील यांच्यासह पदाधिकारी, सभासद, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

# राहुल गांधी आज नाशिक दौऱ्यावर

मुंबई : हॅलो प्रभात



लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी बुधवार (ता.२) रोजी नाशिकच्या एकदिवसीय दौऱ्यावर येणार आहेत. नाशिक येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विश्रामगृहात २४ ऑगस्टपासून सुरू असलेल्या संघटन सृजन अभियानांतर्गत जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांच्या निवासी प्रशिक्षण शिबिराचा त्यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. या कार्यक्रमास काँग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सतेज पाटील, नाना पटोले, माणिकराव ठाकरे, नसीम खान, खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्यासह काँग्रेसचे वरिष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# ‘डी.वाय.पाटील’च्या विद्यार्थ्यांचा वृक्षसंवर्धनाचा संकल्प

## कुशिरे येथे ५०० हून अधिक बीजगोळ्यांची पेरणी ; देशी वृक्षप्रजाती जपण्याचा संदेश

कोल्हापूर : हॅलो प्रभात



देशी वृक्षप्रजातींचे संवर्धन व जैवविविधतेच्या संरक्षणाचा संदेश देत डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या व्यवस्थापन विभागातील तंदुरुस्ती मंडळातर्फे कुशिरे येथे निसर्गभ्रमंती व बीजगोळे निर्मिती उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेत ५०० हून अधिक बीजगोळे तयार करून परिसरात त्यांची पेरणी केली.

विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक प्रसन्नता, संघभावना व नेतृत्वगुण विकसित करण्यासोबत पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे हा उपक्रमाचा उद्देश होता. निसर्गभ्रमंतीनंतर विद्यार्थ्यांनी करंज, शेवगा, जांभूळ, सीताफळ, रामफळ, हिरडा व बेहडा या देशी वृक्षांच्या बियांचा वापर करून बीजगोळे तयार केले. त्यांची कुशिरे परिसरातील योग्य ठिकाणी पेरणी करण्यात आली. सहायक प्राध्यापक अभिजीत पाटील यांनी बीजगोळे तयार करण्याची पद्धत व त्यांचे पर्यावरणीय महत्त्व याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी पोहाळे लेणीस भेट देऊन परिसराचा नैसर्गिक व ऐतिहासिक वारसाही अनुभवला.

यावेळी डॉ. रोहित लांडगे, डॉ. पुरुषोत्तम पेटारे, डॉ. मुग्धा देशपांडे, डॉ. रेणुका तुरंबेकर, प्रा. सागर जानराव, प्रा. व्यंकटेश बडवे, प्रा. अनिकेत परदेशी यांच्यासह दीपक बंडागळे उपस्थित होते. या उपक्रमास डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आ.सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे संचालक डॉ. अजित पाटील, डी. वाय. पाटील स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन अँड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनचे संचालक डॉ.गुरव यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

# कासच्या निसर्गसौंदर्याला पर्यटकांची पसंती

## खा.उदयनराजे ; संवर्धनाची जबाबदारीही आपलीच

सातारा : हॅलो प्रभात



फुलांच्या रंगांची मुक्त उधळण, हिरवाईने नटलेले डोंगर आणि धुक्याची मनमोहक चादर अशा निसर्गरम्य वातावरणात जागतिक वारसा स्थळ असलेल्या कास पठाराच्या फुलोत्सव हंगाम २०२६ ला दिमाखात सुरुवात झाली. खासदार उदयनराजे भोसले यांनी या फुलोत्सवाचे उद्घाटन करून येथील शाश्वत निसर्ग पर्यटकांनी जबाबदारी जपावा असे आवाहन केले.

वन विभाग, सातारा वन परिक्षेत्र सातारा-मेढा आणि कास पठार कार्यकारी समितीच्या वतीने आयोजित हंगामाच्या उद्घाटन सोहळ्यास खासदार उदयनराजे भोसले प्रमुख उपस्थित होते. यावेळी त्यांनी कासच्या पर्यटनाबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जाणीव करून दिली.

“कास पठार हे साताऱ्याची केवळ पर्यटनाची ओळख नाही, तर आपल्या नैसर्गिक आणि जैवविविधतेच्या वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. कास पाहण्यासाठी देश-विदेशातून पर्यटक येतात. त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळतो, व्यवसाय वाढतात आणि परिसरातील अर्थव्यवस्थेला हातभार लागतो,” असे उदयनराजे भोसले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.पर्यटन वाढत असताना कासच्या नाजूक जैवविविधतेचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कास पठाराचा निसर्ग, स्थानिकांचा वारसा आणि पर्यटनातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी यांच्यात योग्य समतोल साधणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे नुकसान न करता पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्यटनाचा मार्ग स्वीकारला पाहिजे, अशी अपेक्षाही उदयनराजे यांनी व्यक्त केली.

उद्घाटन सोहळ्यास भाजपा सातारा लोकसभा संयोजक सुनील काटकर, रक्षक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुशील मोझर, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, वनपरिक्षेत्र अधिकारी संदीप जोपाळे यांच्यासह वन विभागाचे अधिकारी-कर्मचारी, स्थानिक नागरिक व पर्यटक उपस्थित होते.

# स्मार्ट मीटरवरून सरकारला ‘हाण की बडीव’चा इशारा

## सक्ती केली तर महाराष्ट्रभर आंदोलन पेटवण्याचा निर्धार

सांगली : हॅलो प्रभात




स्मार्ट मीटरच्या सक्तीवरून राज्य सरकार आणि महावितरणविरोधात वीज ग्राहकांचा संताप रस्त्यावर उतरला. जयहिंद सेनेचे अध्यक्ष तथा स्मार्ट मीटर विरोधी कृती समितीचे निमंत्रक चंदनदादा चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सांगलीत जिल्हाव्यापी ‘स्मार्ट मीटर हटाओ’ मोर्चा काढण्यात आला. स्मार्ट मीटरची सक्ती तातडीने थांबवून जुने मीटर कायम ठेवावेत,अन्यथा आंदोलन महाराष्ट्रभर तीव्र करण्याचा इशारा चव्हाण यांनी दिला.

विश्रामबाग येथील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चास सुरुवात झाली. घोषणांनी परिसर दणाणून सोडत मोर्चेकरी महावितरण कार्यालयावर धडकले. ‘स्मार्ट मीटरची सक्ती बंद करा’, ‘वीज दर कमी करा’, ‘वीज ग्राहकांची लूट थांबवा’, अशा घोषणांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

**चंदनदादा चव्हाणांचा एल्गार**

महावितरण कार्यालयासमोरील सभेत चंदनदादा चव्हाण यांनी सरकारच्या धोरणावर जोरदार टीका केली. ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर लादण्याचा प्रयत्न केल्यास तीव्र प्रतिकार केला जाईल, असा इशारा त्यांनी दिला. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वाढीव वीज बिलांच्या तक्रारी येत असल्याचा दावा करत त्यांनी जुने मीटर कायम ठेवण्याची मागणी केली.

महाराष्ट्रातील वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असल्याचा आरोप करत सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा देण्यासाठी वीज दर कमी करण्याची मागणीही करण्यात आली. सरकारने ग्राहकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास सांगलीतील आंदोलनाची व्याप्ती राज्यभर वाढवू, असा निर्धार कृती समितीने व्यक्त केला.

मोर्चात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, नगरसेवक, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने वीज ग्राहक सहभागी झाले होते. तोहिद मुजावर, शकील सय्यद, युनुस महात, शेवंता वाघमारे, जैलाब शेख यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी स्मार्ट मीटरच्या सक्तीला विरोध केला.